N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** अकोला **P.S. (पोलीस ठाणे):** रामदासपेठ **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0550 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/09/2026 03:19 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 23/09/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 23/09/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 13:13 तास **Time To (वेळेपर्यंत):** 13:36 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 24/09/2026 **Time (वेळ):** 03:19 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 009 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 24/09/2026 03:19 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 1.5 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** ना मा चाऎधरी विदयालयाच्या, गेट समोर, अकोला,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव): रामदासपेठ

District (State) (जिल्हा (राज्य)): अकोला (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): रमेश दत्तु पवार पोलीस निरीक्षक

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1987

(d) Nationality (राष्‍ट्रीयत्‍व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, बुलढाणा, बुलढाणा शहर, बुलढाणा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, बुलढाणा, बुलढाणा शहर, बुलढाणा, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9689009181

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.मंगेश जगन्नाथ जोशी कनिष्ठ लिपीक वर्ग 3 | | | 1. जिल्हा हिवताप अधिकारी,Town/Village (शहर / गाव): कार्यालय अकोला,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): रामदासपेठ,District (जिल्हा): अकोला,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | डॉ.श्री.अतुल बाळासाहेब शंकरवार जिल्हा हिवताप अधिकारी वर्ग 2 | | | 1. जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय,Town/Village (शहर / गाव): अकोला,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): रामदासपेठ,District (जिल्हा): अकोला,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

पो स्टे ला लेखी फिर्याद दिल्यावर त्वरीत

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11.

Inquest Report / U.D. case No., If any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

S. No. (अ.क्र.) UIDB Number (यु.आय.डी.बी.)

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

नक्कल फिर्याद ला.प्र.वि.बुलढाणा कॅम्प अकोला दिनांक 24.09.2026 मी रमेश दत्तु पवार, वय 39 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलढाणा फिर्याद देतो की, दिनांक 22.09.2026 रोजी तक्रारदार श्री.कार्तिक रमेश काकडे, वय 27 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद आरोग्य सेवक, जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, अकोला, जि.अकोला रा.पाटोदा पो.एकलारा ता.चिखली जि.बुलढाणा यांनी लाप्रवि कार्यालय बुलढाणा येथे समक्ष हजर येवुन तक्रार नोंदविली की, जिल्हा हिवताप अधिकारी, अकोला कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी व जिल्हा हिवताप अधिकारी श्री.अतुल शंकरवार हे तक्रारदार यांना त्याचे जिल्हा हिवताप अधिकारी, बुलढाणा याच्या अंतर्गत ग्रामिण रुग्णालय, चिखली जि.बुलढाणा येथे नियमीत बदली प्रस्तावाचा पाठपुरावा करुन बदली करुन देण्यासाठी 1,20,000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली होती. तक्रारदार श्री.कार्तीक रमेश काकडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, अकोला येथील कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी व जिल्हा हिवताप अधिकारी श्री अतुल शंकरवार यांची लाचेसंबधी पडताळणी करणे असल्याने मा. वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय प्रादेशीक बुलढाणा याना पत्र देवुन दोन कर्मचारी शासकीय पंच म्हणुन उपलब्ध करुन घेवून लाचलुचपत प्रतिबधक विभाग कार्यालय बुलढाणा येथे पडताळणी पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करुन दिनांक 22.09.2026 रोजी आम्ही सोबत सापळा पथक, पंच व तक्रारदार कार्तीक काकडे असे शासकीय वाहनाने पडताळणी व सापळा कार्यवाहीकरीता लागणारे सर्व साहीत्यासह ला.प्र.वि.कार्यालय,बुलढाणा येथुन 11.00 वा. रवाना होवुन 13.15 वा.सुमारास अकोला शहरातील टावर चौकातील जुने बसस्थानक परीसरात हजर आलो सदर ठिकाणावरुन तक्रारदार यांच्याकडे व्हॉईस रेकॉर्डर देवुन पंच क्र.1 यांचेसह लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी व जिल्हा हिवताप अधिकारी श्री.अतुल शंकरवार यांची दिनांक 22.09.2026 चे 13.36 ते 14.06 वा दरम्यान जिल्हा हिवताप अधिकारी, कार्यालय अकोला येथे आयोजीत पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री. कार्तीक काकडे व लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री. मंगेश जोशी यांचेमध्ये झालेल्या बोलणी दरम्यान तक्रारदार यांनी लाच रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी यांनी तक्रारदार यांना नाही, असे सांगुन, एक...विस, असे म्हटले त्यावर तक्रारदार यांनी, फायनल एक लाख विस हजाराल होते? असे विचारले असता लोकसेवक श्री.जोशी म्हणाले की, नाही नं, मी तुला स्पष्ट बोललो जे आहे ते., एक लाख विस हजार, असे म्हणुन तक्रारदार यांना त्यांचे बदली करण्याचे प्रक्रीयेत वरिष्ठ कार्यालयात शिफारसीसह पाठवलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा व बदली करुन देण्यासाठी 1,20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. परंतु तक्रारदार श्री.काकडे व लोकसेवक जिल्हा हिवताप अधिकारी श्री.अतुल शंकरवार यांची भेट न झाल्याने व त्यांची लाच रकमेसंबधाने पडताळणी करणे असल्याने सदर प्रकरणात लोकसेवक जिल्हा हिवताप अधिकारी श्री.अतुल शंकरवार यांची दिनांक 22.09.2026

चे 15.21 ते 17.16 वा दरम्यान दोन वेळा पडताळणी आयोजीत केली असता तक्रारदार श्री.काकडे हे जिल्हा हिवताप अधिकारी श्री.अतुल शंकरवार यांच्यामध्ये बदलीसंबधाने बोलणी झाली. त्यादरम्यान तक्रारदार म्हणाले की, ते एक लाख विस हजार देतो मंगेश जोशी साहेबांकडं , त्यावर जिल्हा हिवताप अधिकारी श्री.शंकरवार म्हणाले की, ठिक आहे, बरं बरं. असे म्हणुन लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी यांनी तक्रारदार यांना बदली करण्याचे प्रक्रीयेत वरिष्ठ कार्यालयात शिफारसीसह पाठवलेल्या बदली प्रस्तावाचा पाठपुरावा व बदली करुन देण्यासाठी मागणी केलेल्या लाच रकमेस संमती व दुजोरा देवुन लाच मागणीस प्रोत्साहन व सहाय्य केल्याचे निष्पन्न झाले. तसेच लोकसेवक श्री.जोशी यांनी तक्रारदार यांना, दोन तीन दिवस लेट दे. ... द्यावु दे आठवडा वाटल्यास, सोमवारी ये पण पुर्ण दे. असे म्हणुन लाच रक्कम स्विकारण्यास संमती दर्शविल्याचे स्पष्ट झाले. त्यावरुन सदर प्रकरणात लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी यांच्याविरुध्द सापळा कारवाई आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दिनांक 22.09.2026 रोजी कार्यालयीन वेळ संपली असल्याने व तक्रारदार यांनी लाच रकमेची व्यवस्था करुन उदया आपणास कळवितो असे सांगीतल्यावरुन पुढील सापळा कार्यवाही दिनांक 23.09.2026 रोजी आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दिनांक 22.09.2026 रोजी आयोजीत पडताळणी कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा तयार करण्यात आला. दिनांक 23.09.2026 रोजी तक्रारदार यांनी लाच रकमेची व्यवस्था केल्याचे सांगीतल्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय बुलढाणा येथे सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण करुन आम्ही सोबत तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक असे सापळा कार्यवाहीकरीता लागणारे सर्व साहीत्यासह शासकीय वाहनाने 11.00 वा सुमारास बुलढाणा येथुन निघुन 13.00 वा अकोला येथील जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाचे जवळील जि.प.माध्य.उर्दु शाळा, अकोला परिसरात पोहचलो. त्यावेळी तक्रारदार श्री.कार्तीक काकडे यांनी लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी हे जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयात हजर असतील असे सांगीतल्यावरुन लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी याच्यावर जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, अकोला येथे सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार यांच्याकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे गळयात शर्टाचे आतील बाजुस बाहेरुन दिसणार नाही अशा स्थितीत लटकवुन देवुन पंच क्र.1 श्री.मोरे यांचेसोबत जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, अकोला येथे रवाना केले. तसेच त्यांचे मागो-माग आम्ही व सापळा पथक असे पायी चालत जावुन जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, अकोला येथे 13.13 ते 13.36 वा दरम्यान सापळा कारवाई आयोजीत केली. सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयात जावुन लोकसेवक श्री.मंगेश जोशी यांची भेट घेतली. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक श्री.मंगेश जोशी असे बोलत-बोलत कार्यालयाचे आवारात आले. त्यावेळी तक्रारदार हे लोकसेवक श्री.जोशी यांना म्हणाले की, हे तुमच्याकडं घेवुन टाका मग, त्यावर लोकसेवक श्री.जोशी म्हणाले की, अं. तिकड, तिकड चालना, ईथ नाही घेत मी तिकडं चालना, त्यावर तक्रारदार श्री.काकडे म्हणाले की, घेवुन टाका न पटकन, त्यावर लोकसेवक श्री.जोशी म्हणाले की, ईथ कुठं ठेवु मी, मी कुठ ठेवु, त्यावर तक्रारदार म्हणाले की, खिशात ठेवा नं. त्यानंतर लोकसेवक श्री.जोशी यांनी तक्रारदार यांना त्यांच्या मोपेड दुचाकी वाहनावर बसवुन घेवुन आरोग्य सेवा अकोला मंडळ, अकोला कार्यालयाचे जवळील ना.मा.चौधरी विदयालयाच्या गेटसमोर वाहन थांबविले. त्यावेळी तक्रारदार श्री.काकडे यांनी त्यांच्या

पॅन्टच्या खिशातुन लाच रक्कम काढुन उजव्या हाताने लोकसेवक श्री.जोशी यांच्यासमोर धरुन म्हणाले की, हे घेवुन घ्या तुम्ही, त्यावर लोकसेवक श्री.जोशी यांनी त्यांच्या मोपेड दुचाकी क्रमांक एम एच 28 सि. ए. 6961 चे सिटखालील डिक्की उघडुन, हं ठेव, असे म्हणुन लाच रक्कम गाडीच्या डिक्कीत ठेवण्यास सांगीतली, त्यानुसार तक्रारदार यांनी लाच रक्कम लोकसेवक श्री.मंगेश जोशी यांच्या मोपेड गाडीच्या डिक्कीत ठेवुन स्वतःच्या डोळयावरील चष्मा काढुन लाच स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला असता लागलीच आम्ही सदर ठिकाणी पोहचुन लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी यांना ताब्यात घेवुन त्यांचे मोपेड वाहनाचे डिक्कीमध्ये लाच रक्कम ठेवलेल्या ठिकाणी कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हायलेट बॅटरीचा प्रकाश टाकुन पाहीले असता अॅन्थ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यामुळे पंचासमक्ष लाच रक्कम ताब्यात घेवुन लोकसेवक यांचे नाव, पद व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री.मंगेश जगन्नाथ जोशी, वय 39 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद कनिष्ठ लिपीक जिल्हा हिवताप अधिकारी, कार्यालय अकोला रा.निसर्ग गार्डन सोसायटी, खडकी, अकोला असे सांगीतले. त्यानंतर लोकसेवक जिल्हा हिवताप अधिकारी श्री.अतुल शंकरवार यांना जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयात जावुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे नाव, पद व पत्ता याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव डॉ.श्री.अतुल बाळासाहेब शंकरवार, वय 42 वर्षे, पद जिल्हा हिवताप अधिकारी, अकोला, रा.व्हि.एच.बी.कॉलनी, गौरक्षण रोड, एल 47 पाण्याच्या टाकीजवळ, अकोला असे सांगीतले. त्यानंतर आयोजीत सापळा कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा तयार केला. तरी यातील तक्रारदार श्री.कार्तिक रमेश काकडे, वय 27 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद आरोग्य सेवक, जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, अकोला, जि.अकोला रा.पाटोदा, पो.एकलारा ता.चिखली जि.बुलढाणा यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 22.09.2026 रोजी आयोजीत पडताळणी कार्यवाहीमध्ये लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी यांनी तक्रारदार यांना त्यांची जिल्हा हिवताप अधिकारी, अकोला येथुन जिल्हा हिवताप अधिकारी, बुलढाणा अंतर्गत चिखली येथे बदली प्रक्रीयेत वरिष्ठ कार्यालयात पाठवलेल्या बदली प्रस्तावाचा पाठपुरावा व बदली करुन देण्यासाठी 1,20,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. तसेच लोकसेवक जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.श्री.अतुल शंकरवार यांनी लोकसेवक कनिष्ठ लिपीक श्री.मंगेश जोशी यांनी तक्रारदार यांना मागणी केलेली लाच रक्कम स्विकारण्यास संमती व दुजोरा देवुन लाच मागणीस प्रोत्साहन व साहाय्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन दिनांक 23.09.2026 रोजीचे 13.13 ते 13.36 वा दरम्यान आयोजीत सापळा कारवाई दरम्यान ना. मा. चौधरी विदयालय अकोला च्या गेटसमोर लोकसेवक श्री.मंगेश जगन्नाथ जोशी, पद कनिष्ठ लिपीक, जिल्हा हिवताप अधिकारी, कार्यालय अकोला यांना तक्रारदार यांच्याकडुन लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. त्यावरुन आरोपी लोकसेवक श्री.मंगेश जगन्नाथ जोशी, वय 39डॉ.श्री.अतुल बाळासाहेब शंकरवार, वय 42 व वर्षे, पद जिल्हा हिवताप अधिकारी, वर्ग 2, जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, अकोला, रा.व्हि.एच.बी.कॉलनी, गौरक्षण रोड, एल 47, पाण्याच्या टाकीजवळ, अकोला व वर्षे, व्यवसाय नोकरी, पद कनिष्ठ लिपीक, वर्ग 3, जिल्हा हिवताप अधिकारी, कार्यालय अकोला, रा.निसर्ग गार्डन सोसायटी, खडकी, अकोला यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये व आरोपी लोकसेवक डॉ.श्री.अतुल बाळासाहेब शंकरवार, वय 42 व वर्षे, पद जिल्हा हिवताप अधिकारी, वर्ग 2, जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, अकोला, रा.व्हि.एच.बी.कॉलनी, गौरक्षण रोड, एल 47,

पाण्याच्या टाकीजवळ, अकोला यांचे कृत्य 12 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 नुसार गुन्हा होत असल्याने त्यांचेविरूध्द माझी सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SHIRISH SAWALARAM KHANDARE (पोलीस निरीक्षक) or (किंवा):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Digitally Signed by: SIDDHARTH SHYAMRAO JANJAL
Rank: HC (Head Constable)
Unique No: 72259373020330005
On: 9/24/2026 3:50:36 AM
At PS: RAMDASPETH, AKOLA

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): SHIRISH SAWALARAM KHANDARE

Rank (हुद्दा): I (Inspector)

14.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

No. (क्र.):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):